# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
# व्यवस्थापन परिषद
# कार्यवृत्तांत
# सोमवार दि. ३० मार्च, २००९ दुपारी ०१-०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची सभा सोमवार दि.३०/०३/०९ रोजी दुपारी १-०० वा.** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरू महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. बी. पी. बंडगर - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | मा. ॲड. रामदास पी. सब्बन-कुलपतींचे प्रतिनिधी | सदस्य |
| ३) | मा. डॉ. बाबासाहेब कदम, शिक्षण सहसंचालक कोल्हापूर विभाग (मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) पुणे यांचे प्रतिनिधी) | सदस्य |
| ४) | मा. डॉ. एल. पी. देशमुख | सदस्य |
| ५) | मा. प्राचार्य डॉ. आर. एन. शेंडगे -संचालक म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ६) | मा. प्राचार्य श्री. जे. के. बिले | सदस्य |
| ७) | मा. प्रा. श्री. पी. एम. हिरेमठ | सदस्य |
| ८) | मा. श्रीमती एन. व्ही. साठे | सदस्या |
| ९) | मा. प्राचार्य डॉ. सी. बी. कोळेकर | सदस्य |
| १०) | मा. श्री. एन. बी. पवार | सदस्य |
| ११) | मा. श्री. बी. पी. रोंगे | सदस्य |
| १२) | मा. डॉ. पी. जी. मोरे | सदस्य |
| १३) | मा. श्री. जयसिंह मोहिते-पाटील | सदस्य |
| १४) | मा. श्रीमती एम. एस. कदम | सदस्या |
| १५) | मा. डॉ. डी. डी. पुजारी -वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १६) | मा. डॉ. डी. जे. साळुंखे -परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| १७) | मा. डॉ. एम. एस. शेजूळ -कुलसचिव | सदस्य सचिव |

**स्वागत:**

प्रथमतः मा.कुलसचिव यांनी सर्व सन्माननीय सदस्यांचे व नवनिर्वाचित सदस्य १) डॉ. डी. जे. साळुंखे परीक्षा नियंत्रक व २) डॉ. डी. डी. पुजारी वित्त व लेखा अधिकारी यांचे स्वागत केले.

**सदर सभेस खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**विषय क्र. १ व्यवस्थापन परिषदेच्या दि.२४ डिसेंबर, २००८ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव क्र.१ व्यवस्थापन परिषदेच्या दि. २४ डिसेंबर, २००८ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्त्यांसह वाचून कायम करण्यात आला.**

**१) पान क्र. ०२ वर, क्र. ०७ मध्ये, "सदस्या" ऐवजी "सदस्य" अशी दुरुस्ती करावी.**

**२) पान क्र.०३ वर, ठराव क्र. ०१ मधील अ.क्र. ०१ मध्ये, "यशोचित" ऐवजी "यथोचित" अशी दुरुस्ती करावी.**

**विषय क्र. २ महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

**(सोबत अहवाल जोडला आहे)**

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.

**ठराव क्र.२ महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेस सादर केलेल्या विद्यापीठ कामकाजाच्या अहवालाची खालील दुरुस्तीसह नोंद घेण्यात आली.**

**१) ५०० एकर भूसंपादनापोटी आतापर्यंत रु.८.०३ कोटी, शास्त्रीय उपकरणे खरेदीकरता रु.२.९८ कोटीची प्रशासकीय मान्यता मिळाली होती त्यापैकी रु.२.५० कोटीची आर्थिक मंजूरी मिळाली आहे. यापूर्वी महाराष्ट्र शासनाकडून बांधकामासाठी मिळालेल्या रु.४.३० कोटीची कामेही प्रगतीपथावर आहे.**

**कु. रसिका श्रीराम हिने ३० मिटर स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग मध्ये सुवर्ण पदक मिळविले हिच्या अभिनंदनाचा ठराव करण्यात आला.**

**सूचक - श्री. एन. बी. पवार**

**अनुमोदन - ॲड. रामदास पी. सब्बन.**

**विषय क्र. ३ सन २००८-०९ च्या सुधारीत अंदाजपत्रकास व सन २००९-१० च्या मूळ अंदाजपत्रकास मंजूरीची बाब मान्यतेसाठी सादर.**

टिपणी:- महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७५ (२) (ई) व (१०१) नुसार वित्त व लेखा अधिकारी यांनी तयार केलेले अंदाजपत्रक वित्त व लेखा समितीच्या विचारार्थ व व्यवस्थापन परिषदेस शिफारशीसाठी वित्त व लेखा समितीच्या सभेपुढे मांडणे आवश्यक आहे.

त्यानुसार दि.१८/०३/२००९ च्या वित्त व लेखा समितीपुढे विद्यापीठाचे सन २००८-०९ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २००९-१० चे मूळ अंदाजपत्रक सादर करण्यात आले. त्यास वित्त व लेखा समितीने दुरुस्तीसह व्यवस्थापन परिषदेस शिफारस केली.

सबब वित्त व लेखा समितीने सुचविलेल्या दुरुस्तीसह अंदाजपत्रक व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र.३ सन २००८-०९ च्या सुधारीत अंदाजपत्रकास व सन २००९-१० च्या मूळ अंदाजपत्रकास खालील दुरुस्त्यांसह मान्यता देण्यात आली.**

**१) पान क्र. २९ वर, क्र. १७ मध्ये, a) मध्ये B.C. Scholarship ऐवजी SC/ST Scholarship अशी दुरुस्ती करावी.**

**२) पान क्र. २९ वर, क्र. १७ मध्ये, c) Post Matric Scholoarship नवीन अंदाजपत्रकीय शिर्षक उघडून रु.१,००,०००/- तरतूद सन २००९-१० साठी करावी.**

**३) पान क्र. २९ वर, क्र. १७ मध्ये, d) above ८०% merit scholarship अशी दुरुस्ती करावी.**

**विषय क्र. ४ दि.२५/०२/२००९ च्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत मान्यतेसाठी सादर.**

टिपणी: दि.२५/२/२००९ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो वित्त व लेखा समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता त्यास दि.१८/०३/२००९ च्या वित्त व लेखा समितीने व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी शिफारस केली आहे.

सबब दि.२५/२/२००९ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र.४ दि.२५/०२/२००९ रोजीच्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांतास मान्यता देण्यात आली.**

**विषय क्र.५ विद्यापीठास वर्षा विजग्राहक सेवा स्वयंरोजगार सह. संस्था या खाजगी कंत्राटदारामार्फत एकत्रित वेतनावरील मनुष्यबळ पुरविण्यासंदर्भात करारनाम्यात अंतर्भाव करण्याची व माहे वेतन ठरविण्याची बाब विचारार्थ**

**टिपणी** - विद्यापीठाच्या जाहिरात क्रं.२३/२००८ दि.१२/११/२००८ अन्वये व्यवस्थापन परिषद दि.२४/१२/२००८ च्या बैठकीत कमांक १९(२) नुसार वर्षा विजग्राहकसेवा स्वयंरोजगार सह. संस्था मर्या. डी, १३७ न्यू संतोष नगर, विजापूर रोड, सोलापूर यांना मनुष्यबळ पुरविण्याबाबतचे कंत्राट जानेवारी २००९ ते नोव्हेंबर २००९ पर्यंत, असा एकूण ११ महिन्याचे देण्यात आले आहे. सदर कंत्राटदारास एकत्रित वेतनावरील अभियंता दोन, संगणक लेखनिक एक, तारतंत्री एक आणि सुरक्षा रक्षक एक असे एकूण (०५) मनुष्यबळ पुरवून यापूर्वी झालेल्या करारनाम्यात दुरूस्ती करण्या संदर्भात प्रपत्र जोडून त्यात कलम २५ एकत्रित वेतनावरील मनुष्यबळ माहे, जानेवारी २००९ ते माहे नोव्हेंबर २००९ या कालावधीसाठी अंतर्भाव करण्यास व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ )

**ठराव क्र.५ विद्यापीठास वर्षा विजग्राहक सेवा स्वयंरोजगार सह. संस्था या खाजगी कंत्राटदारामार्फत एकत्रित वेतनावरील मनुष्यबळ पुरविण्यासंदर्भात करारनाम्यात उक्त कलम २५ अंतर्भाव करण्यास व खालीलप्रमाणे माहे वेतन ठरविण्यास मान्यता देण्यात आली.**

| अ.क्र. | प्रशासकीय सेवकाचे नांव | पदनाम | ठेकेदारामार्फत दरमहा एकत्रित वेतन |
|---|---|---|---|
| १) | श्री. कुलकर्णी जी. ए. | अभियंता (अस्थाई) | रु.८,०००/- |
| २) | श्री. कोळी एस. टी. | अभियंता (अस्थाई) | रु.७,०००/- |
| ३) | श्री. वनतळे एस. आर. | लेखनिक (अस्थाई) | रु.४,५००/- |
| ४) | श्री. खुने बी. एम. | तारतंत्री (अस्थाई) | रु.४,०००/- |
| ५) | श्री. तळीखेडे ए. के. | सुरक्षा रक्षक (अस्थाई) | रु.६,०००/- |
| ६) | श्री. लटके एन. जी. | लेखनिक (अस्थाई) | रु.४,५००/- |

**विषय क्र.६** **पद्मशाली शिक्षण संस्था, सोलापूर संचलित, ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयास महाराष्ट्र शासनाकडून अल्पसंख्यांक दर्जा मिळाल्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.**

प्रस्तावासोबत प्राप्त झालेली ०५ पाने जोडली आहेत.

**टिपणी** - महाराष्ट्र शासनाचे पत्र क्रं. अशैसं-२००७/१३७/प्र.क्रं.१४५/२००७/३५ दि.१२ नोव्हेंबर, २००७ नुसार पद्मशाली शिक्षण संस्था, सोलापूर या संस्थेस अल्पसंख्यांक दर्जा दिल्याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. अल्पसंख्यांक दर्जा हा शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून पुढील तीन वर्षांकरिता विधिग्राहय असेल असे नमूद केलेले आहे.

नजीकच्या काळात विद्यापरिषदेची बैठक होणार नसल्याने मा. कुलगुरू यांनी सदरचा विषय विद्यापरिषदेच्या वतीने मान्य करुन व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीसमोर ठेवण्यास मान्यता दिली आहे.

पद्मशाली शिक्षण संस्था, सोलापूर संचलित, ए. आर. बुर्ला महिला वरीष्ठ महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयास महाराष्ट्र शासनाकडून अल्पसंख्यांक दर्जाचे ना हरकत प्रमाणपत्र दिलेली बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

ठराव क्र.६ **अ) पद्मशाली शिक्षण संस्था, सोलापूर संचलित, ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर यांना महाराष्ट्र शासनाकडून अल्पसंख्यांक दर्जा शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून पुढील तीन वर्षाकरीता विधीग्राह्य असलेल्या ना-हरकत प्रमाणपत्राची नोंद घेण्यात आली.**

**ब) तथापि, संस्थेने दिलेल्या निवड समितीच्या रचनेच्या ठरावातील तरतूदीची नोंद घेतली नाही.**

**क) अल्पसंख्याक दर्जाबाबत कायदेशीर बाबी तपासून विषय क्र.६, ७ व ८ बाबत विद्यापीठास मार्गदर्शन करण्यासाठी खालील समिती नियुक्त करण्यात आली.**

**१) प्राचार्य श्री. जे. के. बिले - अध्यक्ष.**
**२) श्री. एन. बी. पवार - सदस्य.**
**३) डॉ. पी. जी. मोरे - सदस्य.**
**४) श्रीमती एन. व्ही. साठे - सदस्य.**
**५) प्राचार्य डॉ. एच. एन. जगताप -सदस्य.**
**६) प्राचार्य डॉ. ए. एल. देशमुख -सदस्य.**

**ड) सदर समितीने नॉन-मायनॉरिटी इन्स्टिटयूशन्सबाबतच्या प्रचलित पध्दतीचा अभ्यास करुन सूचना कराव्यात.**

**विषय क्र.७** **शांती एज्युकेशन सोसायटी, सोलापूर संचलित, ए.जी. पाटील इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर या महाविद्यालयास महाराष्ट्र शासनाकडून अल्पसंख्यांक दर्जा मिळाल्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर ...**

प्रस्तावासोबत प्राप्त झालेली ०७ पाने जोडली आहेत.

**टिपणी** - महाराष्ट्र शासनाचे पत्र क्रं. अशैसं-२००८/४१३/प्र.क्रं.२२३/२००८/का. १, दि.१० ऑक्टोबर, २००८ नुसार शांती शिक्षण प्रसारक मंडळ, सोलापूर या संस्थेस अल्पसंख्यांक दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र दिलेले आहे. अल्पसंख्यांक दर्जा हा शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून विधिग्राहय असेल असे नमूद केलेले आहे.

नजीकच्या काळात विद्यापरिषदेची बैठक होणार नसल्याने मा. कुलगुरू यांनी सदरचा विषय विद्यापरिषदेच्या वतीने मान्य करुन व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीसमोर ठेवण्यास मान्यता दिली आहे.

विद्याशिक्षण प्रसारक मंडळ पुणे संचलित, ए. जी. पाटील इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, या महाविद्यालयास महाराष्ट्र शासनाकडून अल्पसंख्यांक दर्जा मिळाल्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र.७** **अ) शांती एज्युकेशन सोसायटी, सोलापूर संचलित, ए.जी. पाटील इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर यांना महाराष्ट्र शासनाकडून अल्पसंख्यांक दर्जा शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून विधीग्राह्य असलेल्या ना-हरकत प्रमाणपत्राची नोंद घेण्यात आली.**

**ब) तथापि, संस्थेने दिलेल्या निवड समितीच्या रचनेच्या ठरावातील तरतूदीची नोंद घेतली नाही.**

**विषय क्र.८** **विद्याशिक्षण प्रसारक मंडळ पुणे संचलित, देशभक्त हरिनारायण बंकटलाल सोनी कॉलेज, या महाविद्यालयास महाराष्ट्र शासनाकडून अल्पसंख्यांक दर्जा मिळाल्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर ....**

प्रस्तावासोबत प्राप्त झालेली ०४ पाने जोडली आहेत.

टिपणी - महाराष्ट्र शासनाचे पत्र क्रं. अशैसं-२००८/४६२/प्र.क्रं.३१३/२००८/का. १, दि.२० नोव्हेंबर, २००८ नुसार माहेश्वरी विद्या प्रसारक मंडळ, पुणे या संस्थेस अल्पसंख्यांक दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र दिलेले आहे. अल्पसंख्यांक दर्जा हा शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून विधिग्राहय असेल असे नमूद केलेले आहे.

नजीकच्या काळात विद्यापरिषदेची बैठक होणार नसल्याने मा. कुलगुरू यांनी सदरचा विषय विद्यापरिषदेच्या वतीने मान्य करुन व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीसमोर ठेवण्यास मान्यता दिली आहे.

विद्याशिक्षण प्रसारक मंडळ पुणे संचलित, देशभक्त हरिनारायण बंकटलाल सोनी कॉलेज, या महाविद्यालयास महाराष्ट्र शासनाकडून अल्पसंख्यांक दर्जा मिळाल्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र.८** **अ) विद्याशिक्षण प्रसारक मंडळ पुणे संचलित, देशभक्त हरिनारायण बंकटलाल सोनी कॉलेज, पुणे यांना महाराष्ट्र शासनाकडून अल्पसंख्यांक दर्जा शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून विधीग्राह्य असलेल्या ना-हरकत प्रमाणपत्राची नोंद घेण्यात आली.**

**ब) तथापि, संस्थेने दिलेल्या निवड समितीच्या रचनेच्या ठरावातील तरतूदीची नोंद घेतली नाही.**

**विषय क्र.९** **सर्व संलग्न महाविद्यालयाने प्राचार्य / संचालकांची रिक्त पदे दि.३१ मार्च,२००९ पूर्वी भरणेसाठी केलेली कार्यवाही माहितीसाठी सादर.**

(सोबत पत्राची प्रत जोडली आहे )

टिपणी - मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्रं.२२१६/२००६ वर दिलेल्या निर्णयाप्रमाणे सर्व संलग्न महाविद्यालयांनी प्राचार्य / संचालकांची रिक्त पदे दि. ३१ मार्च, २००९ पूर्वी भरावीत असे आदेश दिलेले आहेत.

याप्रमाणे सर्व संलग्नित महाविद्यालयांना विद्यापीठाने SOL/UTY/BCUD/DH/१०१७५, dtd. २२ Jan. २००९ नुसार खंडपीठाच्या निर्णयास अनुसरून केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर.

**ठराव क्र.९** **मा.उच्च न्यायालय मुंबई नागपूर खंडपीठाच्या याचिका क्र.२२१६/२००६ वर दिलेल्या निर्णयान्वये सर्व संलग्न महाविद्यालयाने प्राचार्य / संचालकाची रिक्त पदे दि. ३१ मार्च २००९ पूर्वी भरण्यासाठी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र.१०** **एम. फिल. व पीएच. डी प्रयोगशाळा मान्यताबाबत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी: विद्यापरिषदेच्या दिनांक ११/१२/२००८ रोजीच्या बैठकीत ठराव क्रं.४०(१०) नुसार प्रयोगशाळा मान्यता द्यावयाचे निकष मान्य केलेले आहेत. नविन नियमानुसार एम. फिल. व पीएच.डी. प्रयोगशाळा मान्यतेसाठी त्या संबंधित विषयातील पदव्युत्तर विभाग संबंधित महाविद्यालयात सुरू असणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | डी.बी.एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर | एम.फिल व पीएच.डी. पदार्थविज्ञान |
| २ | कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर, जिल्हा सोलापूर | एम.फिल व पीएच.डी. पदार्थविज्ञान |
| ३ | कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर, जिल्हा सोलापूर | एम.फिल व पीएच.डी. भूगोल |
| ४ | कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर, जिल्हा सोलापूर | एम.फिल व पीएच.डी. रसायनशास्त्र |
| ५ | वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर | एम.फिल व पीएच.डी. प्राणिशास्त्र |
| ६ | संगमेश्वर कॉलेज, सोलापूर | एम.फिल व पीएच.डी. रसायनशास्त्र |
| ७ | श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी, जिल्हा सोलापूर | पीएच.डी. प्राणीशास्त्र |
| ८ | श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी, जिल्हा सोलापूर | पीएच.डी. रसायनशास्त्र |

वरील यादीप्रमाणे संबंधित महाविद्यालयामध्ये पदव्युत्तर विभाग नसल्यामुळे संबंधित महाविद्यालयास स्थानिक चौकशी समिती पाठविता येणार नाही. सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र.१०** **एम. फिल. व पीएच.डी. प्रयोगशाळा (१ ते ८) मान्यतेबाबतचा विषय अमान्य करण्यात आला.**

**विषय क्र.११** **सोलापूर विद्यापीठामध्ये पदव्यूत्तर विद्यार्थ्यांसाठी रोजगार व स्वयंरोजगार व माहिती व मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यासाठी आवश्यक ते मनुष्यबळ, सोयीसुविधा पुरविण्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

**टिपणी** - दि.२२ जुलै २००४ रोजीच्या महाराष्ट्र शासानाच्या अधिसूचनेनुसार सोलापूर विद्यापीठाची स्थापना झालेली असून प्रत्यक्ष कामकाजास दिनांक १ ऑगस्ट २००४ पासून सुरूवात झालेली आहे. विद्यापीठाच्या स्थापनेनंतर सोलापूर विद्यापीठाकडील हस्तांतरण झालेल्या महाविद्यालयांकडील पदव्युत्तर दर्जाच्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षण पुर्ण झाल्यानंतर नांव नोंदणी करण्याकरिता कोल्हापूर येथे जाण्याचा त्रास कमी होण्याच्या दृष्टीने सोलापूर विद्यापीठाने रोजगार व स्वयंरोजगार माहिती व मार्गदर्शन केंद्र स्वतंत्र या विद्यापीठाच्या परिसरात व्हावे या करिता प्रस्ताव मा. उप-संचालक, सेवायोजन कार्यालय, पुणे यांना सादर करण्यात आला होता.

या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा. उच-संचालक, रोजगार व स्वयंरोजगार, विभागीय मुख्यालय, पुणे यांनी सदर प्रस्ताव मा. आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय, नवी मुंबई यांना पाठविला होता. सोलापूर विद्यापीठामध्ये स्वतंत्र रोजगार स्वयंरोजगार माहिती व मार्गदर्शन केंद्र सुरू करण्याकरिता खालील सुविधा विद्यापीठाने उपलब्ध करून द्यावयाच्या आहेत.

१. कार्यालयासाठी स्वतंत्र जागा, संगणकसंच, फर्निचर इत्यादी उपलब्ध करणे
२. विद्यापीठामार्फत वरिष्ठ लिपिक-१, लिपिक-१, शिपाई-१ अशी तीन कर्मचारी उपलब्ध करुन देणे

उपरोक्त सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत व्यवस्थापन परिषदेची महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम २८(ढ) व २८ (ध) इ्नुसार मान्यता घेणे आवश्यक आहे.

सबब सोलापूर विद्यापीठाच्या परिसरात स्वतंत्रपणे रोजगार, स्वयंरोजगार माहिती व मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यासाठी कोणकोणत्या सोयीसुविधा उपलब्ध करून द्यावयाच्या या बाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र.११** **सोलापूर विद्यापीठामध्ये पदव्यूत्तर विद्यार्थ्यांसाठी रोजगार व स्वयंरोजगार व माहिती व मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यासाठी आवश्यक सोयीसुविधा व कंत्राटदारामार्फत एक लिपीक पुरविण्यास मान्यता देण्यात आली.**

**विषय क्र.१२ सोलापूर महानगरपालिका सोलापूर यांच्या सोलापूर विद्यापीठासमोरील जकात नाका येथे विना खंडीत विद्युत पुरवठा होण्यासाठी एक्सप्रेस फीडरवरुन टॅप कनेक्शन देण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी: याबाबतची पार्श्र्वभूमी खालीलप्रमाणे आहे.

१) सोलापूर विद्यापीठ, सोलापूर महानगरपालिका, दूध पंढरी आणि इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय या चौघांमध्ये एक्सप्रेस फीडर घेण्याचे ठरले होते.

२) याबाबतचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या दि.०५/०७/२००६ रोजी आयत्या वेळेचा विषय क्र.१२ अन्वये सादर करण्यात आला होता (सोबत प्रत).

३) यावरील ठरावानुसार, सोलापूर महानगरपालिका व इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय यांनी एक्सप्रेस फीडर घेण्याकरीता नकार दिला.

४) त्यामुळे दूध पंढरी व सोलापूर विद्यापीठ यांची संयुक्तपणे एक्सप्रेस फीडर घेण्याची तयारी दर्शविली.

५) यानुसार एक्सप्रेस फीडरपोटी येणाऱ्या एकूण खर्चापैकी रु.१२,८३,६५०/- (एकूण रकमेच्या ५०टक्के रक्कम) ही रक्कम दि.०४ जानेवारी २००७ रोजी भरलेली आहे.

आता सोलापूर महानगरपालिकेचा पुणे नाका येथील जकात नाका केगांव येथे असल्याने त्याचा ग्रामीण हद्दीत समावेश होतो. ग्रामीण विभागात सध्या १२-१२ तास विद्युत भारनियमन होत आहे. त्यामुळे सोलापूर महानगरपालिकेने सोलापूर विद्यापीठाकडील असणाऱ्या एक्सप्रेस फीडरवरुन टॅप कनेक्शन मागणी केलेली आहे. सबब, सोलापूर महानगरपालिकेच्या विनंतीनुसार सोलापूर विद्यापीठाकडील एक्सप्रेस फीडरवरुन टॅप कनेक्शन देण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र.१२ सोलापूर महानगरपालिका सोलापूर यांच्या सोलापूर विद्यापीठासमोरील जकात नाका येथे विना खंडीत विद्युत पुरवठा होण्यासाठी एक्सप्रेस फीडरवरुन टॅप कनेक्शन देण्याच्या प्रस्तावास खालील अटीच्या आधीन राहून मान्यता देण्यात आली.**

**१) एक्सप्रेस फीडरसाठी आलेल्या एकूण आलेल्या खर्च रु.२५,८६,७५०/- पैकी १/३ रक्कम सोलापूर महानगरपालिकेने विद्यापीठ आणि दूध पंढरी यांच्याकडे जमा करावी.**

**२) सोलापूर महानगरपालिकेने सोलापूर विद्यापीठासाठी बांधून द्यावयाच्या रु.१.२८ कोटी मल्टीक्लासरुम कॉम्प्लेक्स इमारतीपोटी देय असणारी उर्वरित रक्कम लवकरात लवकर देण्याबाबत पत्राद्वारे विनंती करावी.**

**विषय क्र.१३ School of Computational Sciences मधील Computer Application व Computer Science या दोन विभागात सन २००९-१० या वर्षाकरीता चार अधिव्याख्यातांच्या तात्पुरत्या (मासिक एकत्रित वेतन रु.१२,०००/-) नेमणूकिची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी : School of Computational Science मधील Computer Application व Computer Science या दोन विभागाचा २००९-१० या वर्षाचा कार्यभार खालीलप्रमाणे आहे.

| **MCA Workload** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Class** | **TH. Papers** | **No. of periods/ papers** | **TH. Workload** | **PR. Hrs./Week** | **Total** |
| MCA - I | 5 | 4 | 20 | 24 | 44 |
| MCA – II | 5 | 4 | 20 | 24 | 44 |
| MCA – III | 5 | 4 | 20 | 12 | 32 |
| | | | | Total | 120 |
| M.Sc. ( Computer Science) Workload | | | | | |
| **Class** | **TH. Papers** | **No.of periods/ papers** | **TH. Workload** | **PR. Hrs./Week** | **Total** |
| M.Sc. – I | 4 | 4 | 16 | 12 | 28 |
| M.Sc.- II | 4 | 4 | 16 | 12 | 28 |
| | | | | Total | 56 |

- MCA - १२०
- M.Sc. - ५६

एकूण कार्यभार १७६

वरील कार्यभाराचा विचार करता सन २००९-१० या वर्षाकरीता या विभागांमध्ये चार अधिव्याख्यातांची तात्पुरत्या स्वरुपात नेमणूका (मासिक एकत्रित वेतन रू.१२०००/-) होण्याचे गरजेचे आहे. मागील वर्षी व्यवस्थापन परिषदेने विभागासाठी अशा स्वरूपाच्या चार अधिव्याख्यातांच्या नेमणूकांसाठी मान्यता दिली होती.

वरील व्यवस्थापन परिषदेने निर्माण केलेली पदे महाराष्ट्र विद्यापीठे कायदा क्रं.७७ नुसार भरता येतील. सदर पदावरील खर्च हा विभागाच्या तरतूदी मधून होवू शकतो. सबब सदर विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र.१३ School of Computational Sciences मधील Computer Application व Computer Science या दोन विभागात सन २००९-१० या वर्षाकरीता चार अधिव्याख्यातांच्या तात्पुरत्या मासिक एकत्रित वेतनावर नेमणुकीस मान्यता देण्यात आली.**

**विषय क्र.१४ विद्यापीठात स्थापन केलेल्या विशेष कक्षाचे कामकाज पाहण्याकरिता समन्वयक नियुक्ती व मानधानाबाबत मा. कुलगुरू महोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

**टिपणी** - प्रस्तुत विद्यापीठातील संलग्न महाविद्यालयाची वाढती संख्या व विद्यापीठातील वाढणारे काम सदर काम विहित वेळेत करणे आवश्यक असल्यामुळे निकड लक्षात घेता विशेष कक्ष ( B.C. Cell ) स्थापन केलेली असून सदर कक्षाचे कामकाज संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांच्या अधिपत्याखाली सुरू असून विशेष कक्षाचे कामकाज परिणामकारकरित्या होण्यासाठी विद्यापीठाच्या संलग्नीत महाविद्यालयातील मागासवर्गीय शिक्षकातून श्री. बी. एन. आदटराव यांची विशेष कक्षसमन्वयक म्हणून मा. कुलगुरूंनी मान्यता दिली असून संबंधितांना रू.३,०००/- ( तीन हजार फक्त ) मानधनाबाबत महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अंतर्गत मा. कुलगुरू महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव)

**ठराव क्र.१४ मा.कुलगुरु महोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र.१५ शैक्षणिक वर्ष २००९-२०१० करिता विद्यापीठातील संगणकशास्त्र, सामाजिकशास्त्रे या संकुलासाठी अनुक्रमे दोन व चार अधिव्याख्यातांची तात्पूरती पदे निर्माण करुन Walk-in-Interview द्वारे भरती प्रक्रिया पूर्ण झाली आहे ही बाब माहितीस्तव.**

**टिपणी** -प्रस्तुत विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुलासाठी ०४ अधिव्याख्याता व सामाजिकशास्त्रे संकुलासाठी ०२ अधिव्याख्यातांची शैक्षणिक वर्ष २००९-२०१० साठी आवश्यकता असल्याने महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम ७७ मधील तरतूदी प्रमाणे तात्पूरत्या स्वरुपात पदे निर्माण करुन Walk-in-Interview द्वारे भरती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी जाहिरात प्रकाशित करण्यात आली होती.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने स्थानिक निवड समितीची बैठक दिनांक २०-०२-२००९ व २१-०२-२००९ रोजी आयोजित करुन Walk-in-Interview द्वारे उमेदवरांच्या मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत.

स्थानिक निवड समितीच्या शिफारशीनुसार निवड झालेल्या उमेदवारांची माहिती खालील प्रमाणे :

| अ. क्र. | पदाचे नांव व संकुलाचे नांव | स्थानिक निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांचे नांव | शैक्षणिक पात्रता | एकत्रीत वेतन |
|---|---|---|---|---|
| ०१ | अधिव्याख्याता (कंत्राटी) सामाजिकशास्त्रे संकुल | डॉ. पाटील धनराज आण्णाराव | एम.ए., बी.एड., एम.जे.सी., पीएच. डी. | रु. ________ |
| ०२ | अधिव्याख्याता (कंत्राटी) संगणकशास्त्र संकुल | श्री. चव्हाण आनंद मारोती. | M.Sc. (Computer) | रु. ________ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३ | अधिव्याख्याता (कंत्राटी) संगणकशास्त्र संकुल | डॉ. फोपसे नलिनी जयवंत | Post Graduate Diploma in IT & Ph.D. | रु. ———— |
| ०४ | अधिव्याख्याता (कंत्राटी) संगणकशास्त्र संकुल | श्रीमती माकंदर वजीदा तबस्सुम् एम. | M. C. A. | रु. ———— |

उक्त उमेदवारांचे वेतन हे संबंधित विभागाच्या जमा होणाऱ्या रक्कमेतून (Subject to receipt) करण्यात येणार आहे.

उक्त स्थानिक निवड समितीच्या शिफारशीनुसार निवड झालेल्या उमेदवारांना एका वर्षा करिता एकत्रित वेतनावर तात्पुरते नियुक्ती आदेश निर्गमित करावयाचे आहेत. तद्वतच महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम ७७ अन्वये केलेली कार्यवाही व एकत्रीत वेतन ठरविण्याची बाब विचारार्थ माहितीस्तव..

**ठराव क्र.१५ शैक्षणिक वर्ष २००९-२०१० करिता विद्यापीठातील संगणकशास्त्र, सामाजिकशास्त्रे या संकुलासाठी अनुक्रमे ३ व एक अधिव्याख्यातांची तात्पूरती पदे निर्माण, Walk-in-Interview द्वारे भरती प्रक्रिया पूर्ण केल्याच्या प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.**

**नियमित नियुक्ती करण्यासाठी उमेदवार उपलब्ध न झाल्याने त्या विषयातील कार्यभार घेण्यासाठी अभ्यागत शिक्षकास शासन नियमाप्रमाणे प्रति तासिका तत्वावर नियुक्ती देण्यास मान्यता देण्यात आली.**

**विषय क्र.१६ कर्मचारी कल्याण निधीमध्ये विद्यापीठ वर्गणी हिश्याबाबतची बाब विचारार्थ.**

**टिपणी** - सोलापूर विद्यापीठ कर्मचारी कल्याण निधीच्या घटना व नियमावलीस दि.०९/१०/२००६ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेने ठराव क्रं.२०(५) नुसार मान्यता दिलेली आहे.

सदर कल्याणनिधीचे मा. कुलगुरू हे अध्यक्ष असून मा. कुलसचिव हेसचिव आहेत. तसेच मा. परीक्षा नियंत्रक व मा. संचालक बी.सी.यु.डी. हे सहा. सचिव आहेत. तर मा. वित्त व लेखा अधिकारी हे खजिनदार आहेत.

सदर कल्याणनिधीमधून कर्मचा-यांना त्यांच्या अडीअडचणीच्या प्रसंगी तसेच आजारपण, मुलांचे शिक्षण इ. कारणासाठी रु.५०००/- पर्यंत कर्जरूपाने मदत केली जाते. यासाठी नाममात्र द.सा.द.शे.५ टक्के इतके व्याज आकारणी केली जाते.

कल्याणनिधीसाठी प्रत्येक कर्मचा-यांकडून महिना रु.२०/- इतकी वर्गणी घेतली जाते.

वर्गणी व्यतिरिक्त कल्याणनिधीसाठी इतर उत्पन्नाचे साधन नसल्यामुळे विद्यापीठानेही वर्गणीच्या रुपाने हिस्सा कल्याण निधीमध्ये जमा करण्याबाबत कल्याणनिधीच्या बैठकीमध्ये विषय मांडण्यात आलेला होता. त्यावर सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेपुढे विचारार्थ ठेवण्याबाबत ठराव झालेला आहे.

तरी सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र.१६ सदरचा विषय अमान्य करण्यात आला.**

**विषय क्र.१७ मा. डॉ. एम. के. झांबरे यांचा व्यक्तीगत ग्रंथसंग्रह सोलापूर विद्यापीठ ग्रंथालयास देणगी दाखल स्विकारणेबाबत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी - मा. डॉ. एम.के. झांबरे सरांच्या सोबतच्या पत्रान्वये त्यांचा व्यक्तिगत ग्रंथसंग्रह विद्यापीठ ग्रंथालयास देणगी म्हणून देण्याची त्यांची इच्छा आहे. ग्रंथालयास देणगीदाखल मिळणा-या ग्रंथाची उपयुक्तता तसेच त्यांची वापराबाबतची स्थिती इ. बाबत ग्रंथालय उपसमितीने पाहणी करुन ग्रंथ स्विकारणेबाबत शिफारस करावयाची असते; परंतू सदरचे ग्रंथ हे भूशास्त्र विभागाकडील एम. एस. सी. व पी. एच. डी. च्या विद्यार्थ्यांना अत्यंत उपयुक्त असुन या बाबत मा. विभाग प्रमुख, भूशास्त्र विभाग, यांनी तसे शिफारस पत्र दिले आहे ते या सोबत अवलोकनासाठी जोडला आहे. तरी सदरचा ग्रंथसंग्रह विद्यापीठाकडील "भूशास्त्र" या अधिविभागास उपयुक्त होईल. तो विद्यापीठाने स्विकारावा अशी त्यांची इच्छा आहे.

सदरचा ग्रंथसंग्रह स्विकारणेबाबत महाराष्ट्र राज्य विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (h) प्रमाणे स्विकारणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र.१७ मा. डॉ. एम. के. झांबरे यांचा व्यक्तीगत ग्रंथसंग्रह विद्यापीठ ग्रंथालयास देणगी म्हणून दिलेला प्रस्ताव स्विकारण्यात येवून डॉ. एम. के. झांबरे यांना अभिनंदनाचे पत्र पाठवावे असे ठरले.**

**विषय क्र.१८ डॉ. डी. डी. पुजारी व मिसेस डी. जी. करजगीकर यांची प्रवासभत्ते बिले नियमानुसार अदा करण्याबाबत.**

(टिपणी: डॉ. पुजारी व मिसेस करजगीकर यांनी रोस्टर तपासणीसाठी निरनिराळ्या महाविद्यालयांना भेटी दिल्या. त्यांनी आपली प्रवास भत्ते बिले (डॉ. पुजारी रु.१३५०=०० व मिसेस करजगीकर रु.१४४०=००) ६ महिन्याचा कालावधी संपल्यानंतर कार्यालयाला सादर केली. नियमानुसार व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेनंतरच सदर बिले अदा केली जातात.
सबब, सदरची बिले अदा करण्याकरीता मान्यतेसाठी सादर).

**ठराव क्र.१८ डॉ. डी. डी. पुजारी व मिसेस डी. जी. करजगीकर यांची प्रवासभत्ते देयके लेखा विभागाच्या नियमानुसार आदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९ प्रा.व्ही.तिरुपती अहवालामध्ये ज्या व्यक्तींवर सदर अहवालामध्ये कारवाई करण्याची शिफारस केलेली होती त्यांना मा.कुलगुरुमहोदयांनी गठीत केलेल्या समितीसमोर आपले म्हणणे मांडण्याची संधी देवून त्या म्हणण्यासहीत अहवालाबाबत कार्यवाहीचा विषय व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

टिपणी :- व्यवस्थापन परिषदेच्या दि.११/०४/२००७ रोजीच्या सभेतील विषय क्र.१२ नुसार खालील विषयांची चौकशी करण्यासाठी

१. महात्मा फुले मागासवर्गीय बहुउद्देशीय विकास संस्था वाखरी, ता. पंढरपूर या संस्थेस बॅचलर ऑफ नॅचरोपॅथी ॲन्ड योगिक सायन्स पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी दिली.
२. बी. ए. बी. एड. अभ्यासक्रमास व्यवस्थापन परिषदेची मान्यता नसताना मान्यता दिली.
३. शासन, व्यवस्थापन परिषद व शुल्क समितीची मान्यता न घेता बी. एड.चे शुल्क वाढविले.
४. वालचंद इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील शिक्षक कर्मचाऱ्यांचे विद्यापीठामार्फत प्लेसमेंट झालेले आहे, ती कागदपत्रे महाविद्यालयाशी संबंधित लोक परस्पर घेवून गेले.

प्रा.व्ही.तिरुपती -- अध्यक्ष
प्रा.बी.पी.रोंगे -- सदस्य
प्रा.एन.बी.पवार -- सदस्य

यांची समिती गठीत केली होती. या समितीने चौकशी करुन सादर केलेला अहवाल दि.२७/१२/२००८ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेत विषय क्र.१० अन्वये सादर करण्यात आला. यावरील ठरावानुसार माजी कुलगुरुंना वगळून इतर ज्या व्यक्तींवर सदर अहवालामध्ये कारवाई करण्याची शिफारस केलेली आहे अशा व्यक्तींना मा.कुलगुरुंमहोदयांनी गठीत करावयाच्या समितीसमोर आपले म्हणणे मांडण्याची नैसर्गिक न्यायतत्त्वानुसार संधी देवून त्या म्हणण्यासहीत अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या आगामी सभेपुढे ठेवण्यात यावा असे ठरले. त्यानुसार मा.कुलगुरु यांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली प्रा.एन.बी.पवार, डॉ.सी.बी.कोळेकर, सौ.एन.व्ही.साठे, डॉ.पी.जी.मोरे यांची समिती नियुक्त केली होती.

या समितीने दि. २४/०१/२००८, दि.०४/०२/२००८ सभा घेवून कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या दि.२८/०३/२००८ रोजीच्या सभेपुढे विषय क्र.१४ नुसार व्यवस्थापन परिषदेच्या सभेत सादर करण्यात आला होता. दि.२८/०३/२००८ रोजीच्या सभेच्या कार्यक्रमपत्रिकेमध्ये या विषयाचे कागदपत्रे देण्यात आली आहेत.

सदरचा विषय परत एकदा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र.१९ प्रा. व्ही. तिरुपती समितीचा अहवाल खालील दुरुस्तीसह स्विकारण्यात आला. सर्व प्रकरणी सदर समितीने केलेल्या शिफारशीऐवजी खालीलप्रमाणे ठरविण्यात आले:**

**अहवालामध्ये नमूद केलेल्या संबंधित व्यक्तींना अशा प्रकारच्या चुकांची पुनरावृत्ती होणार नाही याची समज देण्यात यावी असे ठरले.**

**विषय क्र.२० वित्त व लेखा समितीवर व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून नामनिर्देशन करण्याबाबत .**

(टिपणी : महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७५(२)(अ)(v) नुसार वित्त व लेखा समितीवर व्यवस्थापन परिषदेकडून तिच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केल्या जाणा-या तीन व्यक्ती सदस्य असतात. त्यापैकी सध्या एक पद रिक्त झाले असून त्या जागेवर नवीन नामनिर्देशन होणे आवश्यक आहे.

सबब, उपरोक्त प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र.२० वित्त व लेखा समितीवर व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून प्रा. एन. बी. पवार यांचे नामनिर्देशन केले.**
**सूचक - डॉ. पी. जी. मोरे**
**अनुमोदक - डॉ. एल. पी. देशमुख**

**विषय क्र. २१ दि आर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, सोलापूर या महाविद्यालयाच्या नावात बदल करण्याचा प्रस्ताव स्विकारण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

**(टिपणी -** प्रज्ञा निकेतन एज्युकेशन सोसायटी पुणे, संचलित दि आर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, सोलापूर हे महाविद्यालय जून २००८ पासून सुरु आहे. सदर महाविद्यालयाचे नाव 'प्रज्ञा निकेतन एज्युकेशन सोसायटी, पुणे संचलित नागेश करजगी आर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, सोलापूर' असा बदल करण्यास मान्यता देण्याबाबतचे पत्र दिले असून संस्थेने नावात बदल करण्याचे शुल्क रु.१५०००/-भरलेले (पावती क्र. २७५९२, दि.१५-०२-२००९). तसेच याबाबत महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीने ठराव केलेला आहे.

महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्यावतीने या प्रस्तावाच्या शिफारसीस मा.कुलगुरु महोदयांनी मान्यता दिलेली आहे.

पूर्वीचे नाव - 'प्रज्ञा निकेतन एज्युकेशन सोसायटी, पुणे संचलित दि आर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, सोलापूर'

**नावातील बदल - 'प्रज्ञा निकेतन एज्युकेशन सोसायटी, पुणे संचलित नागेश करजगी आर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, सोलापूर'**

असा बदल स्वीकारण्याचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ....

**ठराव क्र.२१ दि आर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, सोलापूर या महाविद्यालयाच्या नावातील बदल खालीलप्रमाणे-**
**'प्रज्ञा निकेतन एज्युकेशन सोसायटी, पुणे संचलित नागेश करजगी आर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, सोलापूर' असा नावातील बदल स्विकारण्यात आला.**

**विषय क्र.२२ विद्यापीठ निधीतून विद्यापीठ परिसरात विविध इमारतीच्या बांधकामावर झालेल्या खर्चाची रक्कम महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झालेल्या बांधकाम निधीत समायोजन करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

**(टिपणी -** महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २४ नोव्हेंबर २००५ च्या शासन निर्णयान्वये विद्यापीठाच्या इमारत बांधकाम व प्रशासकीय खर्चासाठी रु. २ कोटी अतिरिक्त निधी मंजूर करण्यात आला आहे. तत्पूर्वी विद्यापीठ निधीतून विद्यापीठ परिसरात झालेल्या बांधकामावरील व प्रशासकीय खर्च खालीलप्रमाणे

| अ.क्र. | इमारतीचे नांव | झालेला खर्च रुपये |
|---|---|---|
| १) | मल्टीक्लासरुम इमारत (कॉम्प्लेक्स) | १,३०,०१,१८८/- |
| २) | भूशास्त्र संकुल | २१,००,६३५/- |
| ३) | मुलींचे वसतिगृह इमारत | १७,६७,४६२/- |
| ४) | प्रशासकीय खर्च (कंत्राटी कर्मचारी) | ३१,३०,७१५/- |
| | एकूण रुपये | २,००,००,०००/- |

उपरोक्त तक्त्यात दर्शविलेला एकूण खर्च रुपये २,००,००,०००/- (अक्षरी दोन कोटी फक्त) शासनाकडून प्राप्त झालेल्या रक्कम रुपये २ कोटीमधून खर्ची टाकून समायोजन व उपयोगिता प्रमाणपत्र महाराष्ट्र शासनास सादर करण्याबाबत प्रस्ताव व उपरोक्त रकमेचे समायोजन व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र.२२ विद्यापीठ निधीतून विद्यापीठ परिसरात विविध इमारतीच्या बांधकाम आणि प्रशासकीय बाबीवर झालेल्या खर्चाची रक्कम महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झालेल्या रु.२ कोटी बांधकाम निधीत समायोजन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

**विषय क्र.२३ वास्तुविशारद पॅनेलवरील वास्तुविशारदांना त्यांनी केलेल्या वास्तुविषयक कामाबाबत द्यावयाचा मोबदला ठरविण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

**(टिपणी -** विद्यापीठाकडे विविध इमारतीचे बांधकाम करण्यात येते. या इमारतीचे ले आऊट प्लॅन, नकाशा, इमारतीच्या बांधकामाचे अंदाजपत्रक आणि इमारतीचे पुढील बांधकाम टप्प्याटप्प्याने होईल त्याप्रमाणात मोबदला देण्यासाठी निकष ठरविणे आवश्यक आहे.

सबब, वास्तुविशारद पॅनेलवरील वास्तुविशारदांना त्यांनी केलेल्या वास्तुविषयक कामाबाबत द्यावयाच्या मोबदल्याबाबत निकष ठरविण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव क्र.२३** **वास्तुविशारदांचे वास्तुविषयक कामाचा मोबदला ठरविण्याबाबत उपसमिती नियुक्त करण्यात आली. सदर समितीने आपला अहवाल १० दिवसात सादर करावा.**

**१) प्रा. बी. पी. रोंगे - अध्यक्ष.**
**२) डॉ. पी. जी. मोरे -सदस्य.**
**३) प्रा. एन. बी. पवार -सदस्य.**
**४) प्राचार्य जे. के. बिले -सदस्य.**
**५) प्रा. पी. एम. हिरेमठ -सदस्य.**
**६) डॉ. एम. एस. शेजूळ -सदस्य सचिव.**

**विषय क्र.२४** **वास्तुविशारद श्री. यादगिरी कोंडा यांनी सादर केलेल्या देयकाचा सखोल अभ्यास करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

**(टिपणी -** श्री. यादगिरी कोंडा सोलापूर विद्यापीठाच्या काही इमारतींचे वास्तुविशारदाचे काम पहात होते. श्री. यादगिरी कोंडा यांना आतापर्यंत रु.४,५०,०००/- कामापोटी विद्यापीठाने अदा केलेले आहेत. श्री.यादगिरी कोंडा यांनी त्यांचे देयक विद्यापीठास सादर केले आहे. सदरचे देयक अदा करण्याबाबतचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या दि.२४ डिसेंबर, २००८ रोजीच्या सभेत विषय क्र. १२ अन्वये सादर करण्यात आला होता. या विषयावरील ठरावानुसार खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आलेली होती.

१) प्रा. बी .पी. रोंगे - अध्यक्ष.
२) डॉ. एल.पी. देशमुख - सदस्य.
३) डॉ. पी. जी. मोरे - सदस्य.
४) डॉ. एम. एस. शेजूळ - सचिव.

या समितीने या विषयाबाबत सखोल अभ्यास करुन अहवाल सादर केला असून सदरचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र.२४** **वास्तुविशारद श्री. यादगिरी कोंडा यांनी सादर केलेल्या देयकाचा सखोल अभ्यास करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीच्या अहवालाचे ठराव क्र. २३ नुसार गठीत केलेली समितीने पुनर्रावलोकन करुन आपला अहवाल पुढील सभेत सादर करावा असे ठरले.**

**विषय क्र.२५ विद्यापीठामध्ये खालील विषयासाठी प्रयोगशाळा/संशोधन केंद्र सुरु करणेबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ...**

**(टिपणी** - खालील विषयामध्ये पीएच.डी. साठी सद्या संलग्न महाविद्यालयामध्ये पदव्युत्तर प्रयोगशाळा/संशोधन केंद्र उपलब्ध नाहीत त्यामुळे या विषयासाठी विद्यापीठामध्ये प्रयोगशाळा/संशोधन केंद्र सुरु करणे अत्यंत गरजेचे आहे.

**कला व ललित कला विद्याशाखे अंतर्गत येणारे विषय**

१. मराठी, २. हिन्दी, ३. कन्नड, ४. इंग्रजी, ५. उर्दू- पार्शियन

**सामाजिक शास्त्रे विद्याशाखे अंतर्गत येणारे विषय**

१. इतिहास, २. प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती व पुरातत्व,
३. अर्थशास्त्र, ४. राज्यशास्त्र, ५. तत्वज्ञान ६. समाजकार्य ७. मानसशास्त्र

**वाणिज्य विद्याशाखे अंतर्गत येणारे विषय**

१. वाणिज्य

**विज्ञान विद्याशाखे अंतर्गत येणारे विषय**

१. भूगोल २.प्राणीशास्त्र

**विधी विद्याशाखे अंतर्गत येणारे विषय**

१. विधी

**शिक्षणशास्त्र विद्याशाखे अंतर्गत येणारे विषय**

१. शिक्षणशास्त्र, २. शारीरिक शिक्षण

मा.कुलगुरु यांनी वरील विषयासाठी संशोधन केंद्र व योग्य त्या विषयासाठी प्रयोगशाळा विद्यापीठात सुरु करण्यास विद्यापरिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे.

त्यामुळे वरील विषयासाठी संशोधन केंद्र व पदव्युत्तर प्रयोगशाळा विद्यापीठात स्थापन करण्यास व्यवस्थापन परिषदेची मान्यता मिळणेबाबतची बाब विचारार्थ सादर.

**ठराव क्र.२५ विद्यापीठामध्ये खालील विषयासाठी प्रयोगशाळा/संशोधन केंद्र सुरु करण्यास मान्यता देण्यात आली.**

**कला व ललित कला विद्याशाखे अंतर्गत येणारे विषय**

१. मराठी, २. हिन्दी, ३. कन्नड, ४. इंग्रजी, ५. उर्दू- पार्शियन

**सामाजिक शास्त्रे विद्याशाखे अंतर्गत येणारे विषय**

१. इतिहास, २. प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती व पुरातत्व,
३. अर्थशास्त्र, ४. राज्यशास्त्र, ५. तत्वज्ञान ६. समाजकार्य ७. मानसशास्त्र

**वाणिज्य विद्याशाखे अंतर्गत येणारे विषय**

१. वाणिज्य

**विज्ञान विद्याशाखे अंतर्गत येणारे विषय**

१. भूगोल २.प्राणीशास्त्र

**विधी विद्याशाखे अंतर्गत येणारे विषय**

१. विधी

**शिक्षणशास्त्र विद्याशाखे अंतर्गत येणारे विषय**

१. शिक्षणशास्त्र, २. शारीरिक शिक्षण

**विषय क्र.२६ एम.फिल. व पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी शुल्क सुधारणेबाबतचा शुल्क समितीने केलेला प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ...**

टिपणी : विविध अभ्यासक्रमाचे शुल्क ठरविण्यासाठी विद्यापरिषद व व्यवस्थापन परिषदेने प्राचार्य जे.के. बिले यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली होती.

गठित केलेल्या समितीचा कार्यवृतांत व शुल्क तक्ता सोबत जोडला आहे. प्रस्तावित शुल्क सन २००९-१० या शैक्षणिक वर्षापासून लागू करावयाचे असून सदर विषय विद्यापरिषदेच्या दिनांक ११-१२-२००८ रोजीच्या बैठकीत ठराव क्र.४०(११) नुसार मान्य करुन व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेला आहे.

सदरचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र.२६ अ) एम.फिल. व पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून शुल्क लागू करण्याची विद्यापरिषदेची शिफारस खालील दुरुस्तीसह स्विकारण्यात आली.**

**१) मॅगझिन फी रु.१५०/- ऐवजी रु.५०/- करावी.**

**ब) अभियांत्रिकी व फार्मसी विद्याशाखेच्या शुल्क ठरविण्याचा विषय पुढील व्यवस्थापन परिषदेसमोर आणावा असे ठरले.**

**विषय क्र.२७ विद्यापीठाकडील शिक्षण संकूल प्रणालीकरिता (School System) संचालक व शिक्षण संकुल प्रणाली अंतर्गत विभागप्रमुख यांचे पदनाम, कर्तव्य व जबाबदारी संदर्भातील परिनियमाचा मसूदा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(सोबत सुधारीत परिनियमाचा मसूदा)

**(टिपणी -** मा. शिक्षण संचालक (उ.शि) महाराष्ट्र राज्य पुणे यांचे संदर्भ क्र. युएनआय/११२४/सोवि/विशि-१ दि.२५/०४/२००८ नुसार सोलापूर विद्यापीठाकडील पाचही अनुदानित विभागाचे संकूलामध्ये नवीन नामाभिदान करुन शिक्षण संकुल प्रणालीस (School System) मान्यता दिलेली आहे. या अनुषंगाने दि.१०/०९/२००८ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील विषय क्र.६ ते १० अन्वये शिक्षण संकूलाकरिता अस्थायी अभ्यासमंडळे गठीत करण्याची बाब विचारार्थ ठेवण्यात आलेली होती. सदर विषयामध्ये शिक्षण संकूलांना मान्यता असलेली मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) पुणे यांचे पत्र ठेवलेले होते.

सोबत संकुल प्रणालीसाठी गरजेचे असणारे परिनियम जोडले आहेत. सदर परिनियम Statutes Governing the terms and conditions of service of the teachers in the university Teaching Department मधील संबंधित कलमामधील व्यवस्थापन परिषदेच्या मंजूरीनंतर सदर परिनियमाचा मसूदा महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम १४(८) मधील तरतुदीनुसार अंमलात आणता येतील.

संकुलप्रणालीकरीता संचालक व शिक्षण संकुल प्रणाली अंतर्गत विभागप्रमुख यांचे पदनाम, कर्तव्य व जबाबदारी संदर्भातील परिनियमाचा मसूदा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव क्र.२७** **विद्यापीठाकडील शिक्षण संकूल प्रणालीकरिता (School System) संचालक व शिक्षण संकुल प्रणाली अंतर्गत विभागप्रमुख यांचे पदनाम, कर्तव्य व जबाबदारी संदर्भातील परिनियमांच्या मसूद्यावर विद्यापरिषदेचे मत घेऊन त्या मतांसह मसूदा पुढील व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठेवावा असे ठरले.**

**मा.कुलगुरु यांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय:-**

**विषय क्र. २८(१)** **२००७-०८ या वर्षातील प्रा. तुकाराम शिंदे यांनी घेतलेल्या रु.२०००/- तसलमातीचे समायोजनास व दैनंदीन भत्ता व प्रवास भत्ता बिलाची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ .**

टिपणी : दि.१७/११/२००८ रोजी प्रा. तुकाराम शिंदे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम समन्वयक हे तोरणमाळ ता. शाहादा जि. नंदूरबार येथे राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय कार्य नियोजन बैठकीसाठी गेलेले होते. त्यासाठी प्रा. तुकाराम शिंदे यांनी रु.२०००/- तसलमात म्हणून घेतलेली होती. सोलापूर ते तोरणमाळ जाणे-येणे व सदर दिवसांचा देनंदीन व प्रवास भत्ता रु.१७१६/- इतका खर्च झालेला असून उर्वरीत रक्कम रु.२८४/- वित्त व लेखा विभागाकडे जमा करून रु.२०००/- तसलमातीचे समायोजन व दैनंदीन भत्ता व प्रवास भत्ताची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. २८(१)** **सन २००७-०८ या वर्षातील प्रा. तुकाराम शिंदे यांनी घेतलेल्या रु.२०००/- तसलमातीचे समायोजनास व दैनंदीन भत्ता व प्रवास भत्ता बिलास नियमानुसार मान्यता देण्यात आली.**

**विषय क्र. २८(२)** **बांधकाम समितीच्या दि.२६ मार्च, २००९ रोजी झालेल्या सभेतील बांधकाम समितीने केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी.**

टिपणी: बांधकाम समितीची दि.२६ मार्च, २००९ रोजी सभा झाली. या सभेत बांधकाम समितीने केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. २८(२)** **बांधकाम समितीच्या दि.२६ मार्च, २००९ रोजी झालेल्या सभेतील बांधकाम समितीने केलेल्या शिफारशीस मान्यता देण्यात आली.**

**विषय क्र. २८(३)** **२००६-०७ या वर्षातील श्री वैभव द. पवार (सहा. अधिक्षक) यांचा दि.२५/०५/२००६ ते २९/०५/२००६ या कालावधीचा दैनंदीन भत्ता व प्रवास भत्ता बिल मिळण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ .**

टिपणी : श्री वैभव द. पवार ( सहा. अधिक्षक ) दि.२४/०५/२००६ रोजी कार्यालयीन आदेश क्रं.८९२ नुसार दि.२५/०५/२००६ ते २९/०५/२००६ या कालावधीसाठी विद्यापीठाच्या कामास्तव राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर येथे गेले होते.

वरील कालावधीच्या बिल मागणीसाठी सहा महिन्यापेक्षा अधीक कालावधी गेला असून, बिल अदा करण्यासाठी व्यवस्थापन परीषदेची मान्यता आवश्यक आहे. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. २८(३)** **२००६-०७ या वर्षातील श्री वैभव द. पवार (सहा. अधिक्षक) यांचा दि.२५/०५/२००६ ते २९/०५/२००६ या कालावधीचा दैनंदीन भत्ता व प्रवास भत्ता यास नियमानुसार मान्यता देण्यात आली.**

**विषय क्र. २८(४)** **सोलापूर विद्यापीठाच्या घेतल्या जाणा-या विविध परीक्षांची व कोर्सेसची माहिती देण्यासाठी व ब:हिस्त विद्यार्थ्यांचे फॉर्म भरून देण्यासाठी विद्यार्थी सेवा व मार्गदर्शन केंद्रास अधिकृत मंजूरी मिळण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

( सोबत प्रस्ताव जोडला आहे )

टिपणी : सोलापूर विद्यापीठात विविध परीक्षेत बहि:स्त विद्यार्थी म्हणून फॉर्म भरुन परीक्षा घेण्याची सोय आहे. अशा सोयीचा फायदा घेणा-या विद्यार्थ्यांसाठी मध्यवर्ती ठिकाणी "वैभव एज्युकेशनल ॲण्ड सोशल फौंडेशन" यांचा **"वैभव बहि:स्त विद्यार्थी सेवा व मार्गदर्शन केंद्र"** सुरू करण्याचा मानस आहे.

**या केंद्राद्वारे विद्यार्थ्यांना खालील बाबतीत मार्गदर्शन व सेवा मिळणार आहे.**

१) सोलापूर विद्यापीठाच्या सर्व शाखांच्या विविध कोर्सेसची माहिती देण्याची सोय,
२) बहि:स्त व नियमीत विद्यार्थ्यांना सर्व वर्गाच्या परीक्षा, त्याचे विषयग्रुप, विषयांची निवड या संदर्भातील माहिती,
३) निवडलेला अभ्यासक्रम व त्याच्या परीक्षांचे स्वरूप याबाबतीत उपयुक्त माहिती,
४) परीक्षा फॉर्मस, रजिस्ट्रेशन फॉर्म उपलब्ध करून देणे, प्रत्येक फॉर्म बिनचूक भरून घेणे, विद्यापीठाकडे भरावयाची परीक्षा फी व इतर फी इत्यादी तांत्रिक माहिती तसेच वरील सर्वच गोष्टींची पूर्तता करुन त्या अनुषंगाने आवश्यक त्या कागदपत्रांच्या पूर्ततेसह सदर फॉर्म भरुन विद्यापीठाकडे मुदतीत पाठवून देण्याची सेवा.

वरील सर्व सेवा सदर संस्था स्वेच्छेने स्विकारण्यास तयार आहे. ही संस्था शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने सर्वार्थाने विद्यार्थी व पालक यांच्या सोयीची आहे. हे केंद्र सुरू करण्यासाठी विद्यापीठाला कोणत्याही प्रकारची आर्थिक गुंतवणूक करावी लागणार नाही.

सदरचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. २८(४)** **सोलापूर विद्यापीठाच्या घेतल्या जाणा-या विविध परीक्षांची व कोर्सेसची माहिती देण्यासाठी व ब:हिस्थ विद्यार्थ्यांचे फॉर्म भरून देण्यासाठी विद्यार्थी सेवा व मार्गदर्शन केंद्रास अधिकृत मंजूरी देण्यास मान्यता देण्यात आली आणि करारनाम्याच्या मसूदा पुढील सभेत सादर करावा असे ठरले.**

**विषय क्र. २८(५)** **Theory Assessment १०० मार्काच्या पेपरसाठी रु.१/- वाढीची शिफारस व परीक्षा फी मध्येही दरवर्षी ५ टक्के वाढ करण्याबाबत.**

टिपणी: Theory Assessment १०० मार्काच्या पेपरसाठी रु.१/- वाढीची शिफारस व परीक्षा फी मध्येही दरवर्षी ५ टक्के वाढ करण्याबाबत मा. परीक्षा मंडळाच्या दि.०७ मार्च २००९ रोजी झालेल्या बैठकीत शिफारस करण्यात आलेली आहे.

सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. २८(५)** **अ) Theory Assessment १०० मार्काच्या पेपरसाठी रु.१/- वाढीची शिफारस मार्च २००९ पासून लागू करण्यास मान्यता देण्यात आली.**
**ब) परीक्षा फीमध्ये ५ टक्के वाढ स्विकारण्यात आली तथापि या वाढीसह सर्व परीक्षेचे संपूर्ण फी स्ट्रक्चर पुढील सभेत सादर करावे असे ठरले.**

**विषय क्र. २८(६)** **विहीत मुदतीनंतर सादर केलेला पदवी प्रमाणपत्र अर्ज स्विकारुन आगामी दीक्षांत समारंभात पदवी प्रमाणपत्र देणे बाबत.**

टिपणी : दि.१०/१०/२००८ पर्यंत या विहीत मुदतीत पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज् केलेल्या विद्यार्थ्यांना आगामी दीक्षांत समारंभात पदवी प्रमाणपत्र देण्यासाठी दि.११/१२/२००८ रोजी झालेल्या मा. विद्यापरिषदेच्या बैठकीत मा. व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आलेली आहे. विहीत मुदतीनंतर (दि.१६/०२/२००९) रोजी फॅक्सद्वारे प्राप्त झालेल्या अर्जदारास त्याची निकड लक्षात घेवून त्याचा अर्ज रु.१०००/- शुल्क आकारून दीक्षांत समारंभानंतर पदवी प्रमाणपत्र देण्यास मा. कुलगुरूंनी मान्यता दिलेली आहे.

सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर.

**ठराव क्र. २८(६)** **विहीत मुदतीनंतर सादर केलेला पदवी प्रमाणपत्र अर्ज स्विकारुन आगामी दीक्षांत समारंभात पदवी प्रमाणपत्र देण्याबाबत मा.कुलगुरु यांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र. २८(७)** **वकीलांच्या पॅनेलवर ॲडव्होकेट श्री. आर. एम. पेठे यांचा समावेश करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी: वकीलांच्या पॅनेलवर ॲडव्होकेट श्री. आर. एम. पेठे यांचा समावेश करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. २८(७)** **वकीलांच्या पॅनेलवर ॲडव्होकेट श्री. आर. एम. पेठे यांचा समावेश करण्यास मान्यता देण्यात आली.**

**विषय क्र. २८(८)** **वास्तुविशारद पॅनेलवर श्री.महेंद्र एस. पाटील व श्रीमती कांचन एम. पाटील या वास्तुविशारदांची नावे समाविष्ट करण्याबाबत बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी: वास्तुविशारद पॅनेलवर श्री. महेंद्र एस. पाटील व श्रीमती कांचन एम. पाटील यांच्या नावाचा समावेश करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. २८(८)** **वास्तुविशारद पॅनेलवर श्री. महेंद्र एस. पाटील यांचा स्ट्रक्चरल डिझाईनर म्हणून व श्रीमती कांचन एम. पाटील यांचा वास्तुविशारद म्हणून समावेश करण्यास मान्यता देण्यात आली.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने सभा संपल्याचे मा.कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सही/-**
**डॉ.एम.एस.शेजूळ**
**सचिव,**
**व्यवस्थापन परिषद**

**सही/-**
**डॉ. बी.पी. बंडगर**
**अध्यक्ष**
**व्यवस्थापन परिषद**